


॥ सदानंदो विजयते ॥

यज्ञ - दर्शन

संस्थेचे माहितीपत्रक

संपादक - प्रकाश पवार (पाटील)

वर्ष २ रे   पुष्प ७ वे



अग्नि आणि सोमा च्या सामर्थ्याचे स्वरुप

अंध:कार आणि प्रकाश यांची द्योतक असलेला दिवस आणि रात्रीचा संधिकाल समय हा सृष्टि **'आधि दैविक यज्ञाबरोबरच यज्ञाप्रमाणेच'** कर्तव्यतत्पर मनुष्यासाठी सामर्थ्यदायी प्रेरणा आहे. म्हणूनच संधिकाली उपासनेद्वारे दिव्य तेजस्वी अग्निचा आदर्श घेऊन दिनचर्येस प्रारंभ करावा असा संकेत आहे. अहोरात्रीच्या प्रतिदिवशीच्या संधिकालाप्रमाणेच एका महिन्याचे दोन संधिकाल असतात. त्या संधिकालास आमावस्या व पौर्णिमा असे म्हणतात. याचे परिज्ञान होण्यासाठी पौर्णिमा आणि प्रतिपदेच्या संधिकाली तसेच आमावस्या व प्रतिपदेच्या संधिकाली तसेच आमावस्या व प्रतिपदेच्या संधिकाली **इष्टि** नावाचा **यज्ञ** करावा लागतो. यासच दर्शपौर्णमासइष्टि **'यज्ञ'** असे म्हणतात.

"अग्निसोमात्मकम् जगत्"

सुष्टिच्या सृजनाचे आधारभूत मूलतत्व अग्निसोम हे आहे.

सध्या व्यवहारात विद्युत शक्तीचे कार्य व महत्व सर्वांना सुपरिचित आहे. विद्युत शक्ती निर्माण करण्यासाठी दोन मूलधातूंची आवश्यकता असते. एक धन विद्युत व एक ऋण विद्युत. या दोन्हीच्या संयोगाचे प्रचंड विद्युत शक्ती निर्माण होऊन असंख्य पदार्थ निर्मीतीचे कारखाने चालविण्यास शक्ती मिळते. या धन आणि ऋण मूलतत्वास वैदिक परिभाषेत अग्नि आणि सोम असे म्हणतात. वरील विद्युत निर्मीतीचे उदाहरण हे मानव निर्मीत कृत्रिम आहे आणि परमेश्वर निर्मीत प्रेरक दिव्यशक्ती असलेल्या अग्नि आणि सोमाचे मूलतत्व हे ईश्वर निर्मीत म्हधजेच नैसर्गिक आहे ?

महिन्याच्या दोन संधिकाली शुक्ल आणि कृष्ण पक्षाच्या संधिकाली अनुक्रमे दर्श इष्टि व पौर्णिमासेष्टी असे प्रतिमासी दोन यज्ञ करावयाचा वैदिक संकेत आहे. इष्टि च्या कर्माच्या प्रधान देवता अग्नि आणि सोम आहे.

दर्श पौर्णिमासी पासून पुढील सर्व महायज्ञांची दर्शपौर्णिमा सेष्टि ही छोटी प्रतिकृती आहे. प्रकृती आहे. म्हणून यास प्रकृती याग असे म्हणतात. अग्नितत्व अत्यंत प्रखर तेजस्वी असल्यामुळे शुष्क आहे आणि सोम हे तत्व सौम्य असून द्रवमय म्हणजे ओले आहे. जगाच्या सृष्टिरचनेचे हे दोन मूळ धातू म्हणजेच अग्नि आणि सोम एकत्र मिळवल्या शिवाय सृष्टिची कोणतेही कार्य घडू शकत नाही. म्हणून **'अग्नि सामोत्मकं जगत्'** म्हणजे अग्नि आणि सोम हे सृष्टि रचनेतील जीवनदायी मूलतत्व आहे.

सर्व शक्तिमान जगन्नियंता परमात्मा हा अग्नि आहे आणि प्रकृती ही सोम आहे. त्याचेच प्रतिक असलेली मानव प्राणी सृष्टि सुद्धा अग्निसोमातूनच आहे. यामध्ये पुरुष हा अग्नि असून स्त्री ही सोम तत्व आहे. पुरुष हा प्रखर म्हणजे अग्नि प्रमाणे तेजस्वी असून शुष्क असतो. या उलट स्त्री ही अत्यंत सौम्य स्नेहमयी मृदु व कोमल स्वभावाची असते. स्वाभाविकपणे हे दोन्ही गुण परस्पर विरोधी आहेत परंतु हे दोन्ही तत्व एकत्र मिळाल्यावाचून सृष्टि रचनेतील कोणतेही सृजन **'निर्माण'** संभवत नाही. याच अर्थी श्रीमत् भगवद्गीते मध्ये खालील वर्णन आढळते.

पुरुष: प्रकृति स्थो हि भुङ्क्ते प्रकृतिजान् गुणान् कारणं गुण सं गो स्य सदसद्योनि जन्मसु ॥ १३.२१ ॥

अर्थात् अग्नि म्हणजे पुरुष आणि सोम म्हणजे स्त्री **'प्रकृति'** हे दोन्ही एकत्र आल्यावरच सृजन **'निर्माण'** क्रिया घडते. किंवा दुसरे उदाहरण द्यायचे झाल्यास अग्निस्वरुप हा परमेश्वर सौम्य स्वरुपा प्रकृतीशी संभोग करुनच सर्व सृष्टिची निर्मीती घडवितो. पहा, श्रीमद् भगवतगीता अ. १४, श्लोक ३

मम योनिर्महद् ब्रह्म तस्मिन गर्भं दधाम्याहम् ।
संभव: सर्व भूतानां ततो भवति भारत ॥

याच श्लोकावर रसाळ भाष्य करताना संताग्रणी ज्ञानेश्वर माऊलींनी सुद्धा स्पष्ट म्हणले आहे की,

तरी माझि ही गृहिणी । अनादि तरुणी । अनिर्वाच्या गुणी । अविद्या हे ॥ १४.८७ ॥
पै माझे नि ची अंगे । पौढ ल्या हे जागे । आणि सत्ता संभोगे । गुर्वीणी होय ॥ १४.८९ ॥

सरांश, दोन परस्पर भिन्न, विरोधी स्वभावाच्या वस्तू एकत्र मिळल्यामुळे किती प्रचंड शक्ती निर्माण होऊ शकते याचे प्रतिक म्हणून अग्नि सोमात्मक इष्टि यज्ञाकडे पहाणे आवश्यक आहे. या नंतर दर्श पौर्णिमास इष्टि मध्ये होणाऱ्या विविध प्रक्रियांकडे वळू.

– दीक्षित रंगनाथ कृष्ण सेलूकर

संध्योपासना

१) ॐ आपो हि ष्ठा मयोभुव:। ॐ ता: न: ऊर्जे दधातन। ॐ महे रणाय चक्षसे।

२) ॐ यो व: शिवतमो रस:। ॐ तस्य भाजयतेह न:। ॐ उशतीरिव मातर:। ३) ॐ तस्मा अरं गमाम व:। ॐ यस्य क्षयाय जिन्वथ। ॐ आपो जनयथा च न:। ४) ॐ शं नो देविरभिष्टय आपो भवन्तु पीतये। शं योरभिस्रवन्तु न:। (अभिष्टये भवन्तू = देदीप्यमान उदकदेवता आम्हाला कल्याणकारक होवोत. आम्हाला पाहिजे असलेले देणाऱ्या ऐहिक व पारलौकिक सुख देणाऱ्या होवोत, चांगले पेय देणाऱ्या होवोत, उत्पन्न झालेल्या व होणाऱ्या रोगभयाचे निवारण करोत. जलदेवतांनी माझ्यावर सर्व बाजूंनी प्रवाह चालू ठेवावा.) ५) ॐ ईशाना वार्याणां क्षयन्तीश्चर्षणीनाम्। अपो याचामि भेजम्। (पंचमी वर्धमाना ६, ७, ८ अक्षरे) (पापतापांचे निवारण करण्यास समर्थ आणि वैराग्यज्ञानभक्ती साधनाची उत्पत्ती करणाऱ्या सर्व प्रजांच्या निवासाला साधनभूत असलेल्या जलदेवतांना भवरोगनिवारक औषधाची याचना करतो. उदकामध्ये सर्व औषधी आहेत.) ६) ॐ अप्सु मे सोमो अब्रवीदन्तर्विश्वानि भेषजा।फग्निं च विश्वशंभुवम्। (चंद्राने मला सांगितले की, जलामध्ये सर्व प्रकारची औषधे आहेत, तसेच जगाला आरोग्य व सुख देणाऱ्या जलातील अग्नीलासुद्धा सोमानेच सांगितले म्हणून मी दोघांजवळ मागत आहे.) (विश्वं - शं - भुवम्) ७) ॐ आप: पृणीत भेषजं वरूथं तन्वे३ मम। ज्योक्च सूर्य दृशे। (स्पती प्रतिष्ठा ८, ७, ६ अक्षरे) (जलदेवतांनो, स्थूल व सूक्ष्म देहाला भरपूर औषध पूर्णपणे द्या म्हणजे मी लवकर व चिरकाल आत्मसूर्याला पाहीन. - अध्यात्मात आत्म्याला सूर्य म्हणतात) ८) ॐ इदमाप: प्रवहत यत्किञ्च दुरितं मयि। यद्वाऽहमभिदुद्रोह यद्वा शेप उतानृतम्। (अनुष्टुप्) (जलदेवतांनो, माझ्यात जे काही अज्ञानादी पाप आहे आणि जे दुसऱ्यांचा द्रोह इ. पाप केलेले असेल, जे शाप दिले असतील, जे असत्य भाषणादी पाप असेल ते सर्व तुम्ही धुऊन नष्ट करा.) ९) ॐ आपो अद्यान्वचारिषं रसेन समगस्महि। पयस्वानग्न आगहि तं मा संसृज वर्चसा। (अनुष्टुप्) (जल देवतांनो, आज मी तुमची सेवा केली आहे आणि तुमच्या रसाचा आम्हाला लाभ झाला आहे. जलातील अग्निदेवा, माझ्या बुद्धीत येऊन राहा व मला ब्रह्मतेजाने संपन्न करा.)

३) ॐ भूर्भुव:स्व:। ॐ तत्सवितुर्वरेण्यं (वरेणियम्) भर्गो देवस्य धीमहि। धियो यो न: प्रचोदयात्। ॐ नम:।

४) ॐ सुस्त्रुषीस्तदपसो दिवा नक्तं च सस्त्रुषी:। वरेण्यक्रतूरहमा देवीरवसे हुवे। (प्रसिद्ध स्वर्गादी लोक प्राप्त करून देणाऱ्या अहोरात्र गंगादी नद्यांच्या रुपानी वाहणाऱ्या आणि श्रेष्ठ याग करण्यास आवश्यक असलेल्या देदीप्यमान जलदेवतांना मी रक्षणासाठी आवाहन करतो.)

५) ॐ अपो-ज्योती-रसोऽमृतं-ब्रह्मं-भूर्भुव: स्वरोम्। (आचम्य, प्राणायामं कृत्वा)

७) अघमर्षणम् (पापनाशनम्) सूक्तम् (सु + उक्तम्) - ॐ ऋतं चेति तृचस्य माधुच्छन्दसोऽघमर्षण ऋषि:। भाववृत्तं देवता। अनुष्टुप् छन्द:। अघमर्षणे विनियोग:। तीन ऋचा - १) ॐ ऋतं च सत्यं चाभीद्धात्तपसोध्यजायत। (ऋत-निसर्गानुसार सत्य पण बदलणारे, व सत्य म्हणजे परब्रह्म न बदलणारे, तप म्हणजे 'एकोऽहं बहुस्यां प्रजायेय,' अभि इद्धत् म्हणजे सर्व बाजूंनी दीप्तिमान परमेश्वरापासून, अजायत म्हणजे उत्पन्न झाले.) ततो रात्र्यजायत तत: समुद्रो अर्णव:। (प्रथम रात्र व नंतर समुद्र आणि जलाशय उत्पन्न झाले.) २) समुद्रादर्णवादधिसंवत्सरो अजायत। (नंतर संवत्सर उत्पन्न झाले.) अहो रात्राणि विदधद्विश्वस्य मिषतो वशी। (नंतर दिवस, रात्र, पक्ष, मास करणारा व विश्वाला वश करणारा असा संवत्सर काळ उत्पन्न झाला) तो उत्पादक परमेश्वर अहोरात्र व तसलेच दुसरेही सर्व काळाचे अवयव उत्पन्न करीत निमिषोन्मेषादी युक्त सर्व प्राण्यांचा स्वामी होतो. ३) सूर्याचंद्रमसौ धाता यथापूर्वमकल्पयत्। दिवं च पृथिवी चान्तरिक्षमथो स्व:। (पूर्व कल्पात होते त्याप्रमाणे सूर्यचंद्रादी सात लोक निर्माण केले.) दक्षिण नासया पापपुरुषां निरस्य तज्जलम नावलोक्य वाम भागे क्षितौ क्षिपेत (पाण्यात उजव्या नाकपुडीने श्वास सोडावा व पाप पुरुषाची कल्पना करावी मग ते पाणी न पाहता डाव्या बाजूकडे भूमीवर फेकावे.) आचम्य (आचमन करून नंतर)

८) अर्घ्यप्रदानम् प्रदक्षिणा च - १) प्रणवस्य ऋषिर्ब्रह्मा।ऽग्नामात्मा देवता। दैवी गायत्री छन्द:। २) समस्त व्याहृतीां प्रजापतिर्ऋषि:।ऽविता देवता। गायत्री छन्द:। (सूर्यबिंबांतर्गत ब्रह्म) एतेषां श्रीसूर्यायार्घ्यदाने विनियोग:। १) ॐ (अवति इति ॐ) २) ॐ भूर्भुव: स्व:। (समस्त व्याहृती) ३) ॐ तत्सवितुर्वरेण्यं (वरेणियम्) भर्गो देवस्य धीमहि। धियो यो न: प्रचोदयात्। ॐ नम:। (त्रिपदा गायत्री ८ + ८ + ८ = २४ अक्षरे) 'जो सूर्य आमच्या बुद्धिवृत्ती, प्रज्ञा वगैरेंना धर्मासंबंधी प्रेरणा देतो, त्याचे स्वयंप्रकाशमान परमात्म्याचे, वरणीय प्रार्थनेने प्राप्त करून घेण्यासारखे परमानंदरूप उत्कृष्ट तेजाचे आम्ही ध्यान करतो.' ॐ श्रीसवितृसूर्यनारायणाय इदमर्घ्यं दत्तं न मम। इति त्रि:। प्रत्येक अर्घ्य दिल्याबरोबर त्या गयात्री अस्त्राला परत आणण्यासाठी अस्त्रोपसंहरण करावे. अर्घ्य तीन वेळा - शस्त्रनाशाय, हय नाशाय व मंदेहनाम् राक्षसानाम् वधार्थाय.) असौ इति मंत्रस्य प्रजापतिऋषि। आदित्यो देवता। निचृत्प्रजापत्या गायत्री छंद:। प्रदक्षिणायां विनियोग:। मंदेह असुराना जाळल्याचे प्रायश्चित म्हणून स्वत:भोवती प्रदक्षिणा घालावी व मंत्र म्हणावा. ॐ असावदित्यो ब्रह्म। (हा प्रत्यक्ष दिसणारा सूर्य हेच ब्रह्म) संध्येतील महावाक्य जाणावे. सूर्य हा स्वयंप्रकाश असून प्रकाश व उष्णता देतो. बाहेर दिसणारा सूर्य व शरीरात चैतन्यरूपाने असणारा आत्मरूपी सूर्य बुद्धी, प्राण व मनासह अकरा इंद्रिये यांना प्रकाशित करतो. म्हणूनच आत्म्याला सूर्य म्हणतात. कूटस्थ आत्म्याचे प्रतिबिंब म्हणजे 'जीवात्मा'. अहं ब्रह्मास्मि। जीवो ब्रह्मैव नापर: ।) असे चिंतन करावे. (आचम्य प्राणायामं कृत्वा.) महत्त्वाचह भावना अशी की, हृदयातील गायत्री तेज उजव्या नाकपुडीतून ओंजळीतील पाण्यात आले आहे ते केवळ स्वस्थानी परतण्यासाठीच. या गायत्री मंत्रोच्चाराने पाणी अभिमंत्रित, करून संदेह राक्षसांचा नाश व्हावा म्हणून ते पाणी फेकावे, उडवावे. लगेचच ते तेज डाव्या नाकपुडीतून परत स्वस्थानी आपल्या हृदयात आणताना पुढील मंत्र म्हणावा. उत्तिष्ठ देवि गन्तव्यं पुनरागमनाय च। अशी प्रार्थना करावी.

९) **अस्त्रोपसंहार** - मंत्रस्य प्रजापतिऋषि:। ब्रह्माग्निवाय्वादित्या देवता:। यजुश्छन्द:। अस्त्रोपसंहरणे विनियोग:। **ॐ आपो ज्योती रसोऽमृतं ब्रह्म भूर्भुव: स्वरोम्।** (गायत्रीशिराप्रमाणेच अस्त्रोपसंहाराचा मंत्र) (जल, तेज, रस, अमृत (अन्न) ब्रह्म (सामवेद) भूलोकादी सर्व लोकसुद्धा ब्रह्मच आहेत.) **आगच्छ देवि स्थातव्यं प्रविश्यं हृदयं मम।** (आचम्य प्राणायामं कृत्वा)

१०) **आसनम्** - पृथ्वीति मंत्रस्य मेरुपृष्ठ ऋषि:। कूर्मो देवता सुतलं छन्द:। आसने विनियोग:। **१) ॐ पृथ्वि त्वया धृता लोका देवि त्वं विष्णुना धृता। त्वं च धारण मां देवि पवित्रं कुरु चा ऽऽ सनम्। २) ऊर्ध्वकेशि विरूपाक्षि मांसशोणितभक्षणे। तिष्ठ देवि शिखाबन्धे चामुण्डे ह्यपराजिते। ३) अपसर्पन्तु ते भूता ये भूता भूमिसंस्थिता:। ये भूता विघ्नकर्तारस्ते गच्छन्तु शिवाज्ञया। ४) अपक्रामन्तु भूतानि पिशाचा: सर्वतोदिशम्। सर्वेषामविरोधेन ब्रह्मकर्म समारभे।**

११) **हृदयादि न्यास** - गायत्र्या विश्वमित्र ऋषि:। सविता देवता। गायत्रीछन्द:। न्यासे जपे च विनियोग:। (न्यास-ठेवणे) **ॐ तत्सवितुर्हृदयाय नम:। ॐ वरेण्यं शिरसे स्वाहा। ॐ भर्गो देवस्य शिखायै वषट्। ॐ धीमहि कवचाय हुम्। ॐ धियो यो न: नेत्रत्रयाय वौषट्। ॐ प्रचोदयात् अस्त्राय फट्। इति दिग्बन्ध:** (वषट्, हुम्, वौषट्, फट् हे सारे उद्गारवाचक शब्द आहेत.)

१२) **गायत्रीध्यानं** - (पंचमुखी गायत्रीचे ध्यान) (प्रधान कर्म) **मुक्त-विद्रुम-हेम-नील-धवल-च्छायैर्मुखैस्त्र्यक्षणै:। युक्तामिन्दुकला-निबद्ध-मुकुटां तत्त्वार्थवर्णात्मिकाम्। गायत्री वरदाभयांऽकुश-कशा-शूलं-कपालं-गुणं। शंखं चक्रमथारविन्दयुगलं हस्तैर्वहन्ती भजे।।** (विद्रुम = पोवळे, कशा = चाबुक) (गायत्री देवीची पाच मुखे मोती, पोवळे, सोने, इंद्रनीलमणी व शुभ्र अशा रंगछटांची असून, प्रत्येकास तीन डोळे व चंद्रकोरयुक्त मुकुट आहे. देवी २४ तत्त्वप्रतिपादक, २४ अक्षरमय आहे. तसेच १० हातांत, १० वस्तू धारण करणारी आहे. अशा देवीचे ध्यान करतो.)

१३) **आवाहनम्** - **आगच्छ वरदे देवि जपे मे संनिधौ भव। गायन्तं त्रायसे यस्मात् गायत्री त्वं तत: स्मृता। १** (गायत्री शब्दाचा अर्थ) **ो देव: सवितास्माकं धियो धर्मादिगोचरे। प्रेरयेत्तस्य तत् भर्गस्तद्वरेण्यमुपास्महे। २** (गायत्री मंत्राचा अर्थ)

१४) **गायत्रीजपमहं करिष्ये।** (प्रधान कर्म) **ॐ भूर्भुव: स्व:। ॐ तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि। धियो यो न: प्रचोदयात्। ॐ नम:।** (ॐ भू: इ. सर्व ब्रह्मच आहे. ॐ (ब्रह्म) तत् (त्याचे) सवितु: (सूर्याचे) वरेण्यं (परमोत्कृष्ट) भर्ग: (अविद्या नाशक) देवस्य (स्वयंप्रकाशमानाचे) धीमहि (आम्ही ध्यान करतो) धिय: (बुद्धी) य: (जो) न: (आमच्या) प्रचोदयात् (प्रेरणा स्फूर्ती देतो.) गायत्री महात्म्य - गायत्र्या न परं जाप्यम्। गायत्र्या न परं तप:। गायत्र्या न परं ध्यानम्। गायत्र्या न परं हुतम्। (यमस्मृति) अष्टोत्तरशतमष्टाविंशतिर्दशवारं वा गायत्री जप्त्वा। **ॐ आपो ज्योती रसोऽमृतं ब्रह्म भूर्भुव: स्वरोम्।** पुन: तत्सवितुरिति षडंगन्यासं कृत्वा उपस्थानं कुर्यात्। **ॐ तत्सवितुर्हृदयाय नम:। ॐ वरेण्यं शिरसे स्वाहा। ॐ भर्गो देवस्य शिखायै वषट्। ॐ धीमहि कवचाय हुम्। ॐ धियो यो न: नेत्रत्रयाय वौषट्। ॐ प्रचोदयात् अस्त्राय फट्। इति दिग्बन्ध:।**

(क्रमश:)

- विशेष सूचना -

यज्ञमय जीवनाचे प्रत्यक्ष स्वरुप असलेले महान संत सोमयाजी दीक्षित श्रीकृष्ण सेलूकर महाराज यांची पुण्यतिथी माघ शुद्ध ४ शुक्रवार दि. २९/१/२०१० रोजी भावपूर्ण वातावरण संपन्न होणार आहे. या निमित्ताने धर्मजागरणाचे विविध कार्यक्रम आयोजीत करण्यात आले आहेत. सर्व सद्धर्म प्रेमी, शिष्य, सांप्रदायीक व भाविक मंडळींना या कार्यक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी महर्षी याज्ञवाल्क्य संस्कृत विद्या प्रतिष्ठान, यज्ञभूमी, गंगाखेड येथे आमंत्रित केले आहे.

गुरुपौर्णीमा उत्सव वृत्तांत

आढाष शुद्ध १४ मंगळवार दि. ७/७/२००९ रोजीची सकाळ एक रम्यमय वातावरण घेऊन आली होती. यज्ञभूमी गंगाखेड येथील सर्वांची लगबग सुरु होती. सत्र सोमयाजी दीक्षित रंगनाथ कृष्ण सेलूकर महाराज यांच्या समाधीस अभिषेक ठिक ५ वाजता सुरु झाला. तसेच गंगाकाठी सोमयाजी दीक्षित कृष्ण महाराज सेलूकर यांच्या समाधीस अभिषेक ठिक ७ वाजता सुरु झाला. ८ वाजता सामुदायीक श्रीसुक्त हवन विधी प. पू. सोमयाजी दीक्षित यज्ञेश्वर रंगनाथ सेलूकर महाराज यांच्या सुश्राव वानीने संपन्न झाला सकाळी ९ वाजता खरोळेकर भक्तांनी भक्तीगीत सादर केले. तर येथील ह. भ. प. श्री पद्भनाभजी व्यास यांचे सुश्राव कीर्तन झाले. श्री भुमकर सर यांचे प्रवचन झाले. त्यांनी गुरु भक्ती व गुरु परंपरा व त्यांचे पालन व निर्वाह कसा करावा व स्वत: आदर्श घालून देताना एक विद्यार्थी दत्तक घेऊन त्याला लागणारे वह्या, पुस्तक, दप्तद यासाठी म्हणून २५०० रु. दरवर्षी देण्याचे जाहीर केले व प्रथम चेक यावर्षाकरिता दिला. यानंतर व्यास पूजनाचा कार्यक्रम होऊन विद्यार्थ्यांनी आपल्या गुरु चे पुजन केले. आलेल्या शिष्यमंडळी पैकी प्रतिनिधीक स्वरुपात प्रत्येक जिल्हयाच्या प्रतिनिधींनी पादुका पुजन केले व महाप्रसादाने या सर्व कार्यक्रमाची सांगता झाली. या सर्व कार्यक्रमावार प. पू. यज्ञेश्वर रंगनाथ सेलुकर महाराज यांची नजर होती व आसलेल्या प्रत्येक शिष्यास प्रसाद घेतला का नाही. अजून कोण आले आहे. यांची आस्थेवाईक चौकशी केली जात होती. आजपर्यंत झालेल्या कार्यक्रमात हा कार्यक्रम नियोजनबद्ध व वेळेच्या काटेकोर पालनामुळे स्मरणात राहिल.

सद्धर्मानुरागी यज्ञक हो,

आपल्या देशाचा, प्राचीन गौरवशाली इतिहास य ज्ञानुष्ठानाने आणि यज्ञीय संस्काराने भरलेला तसेच भारलेला आहे.

सृष्टी संचलन करणाऱ्या निसर्ग स्थित दिव्य शक्ती (देवतां) ना, त्यांच्या सृष्टी समृद्धीकरणाच्या कार्यात सहाय्यभूत होण्यासाठी, विविध भौतिक घटक द्रव्ये (द्रव्य) अग्निच्या माध्यमातून प्रवाहित करणे (आहूत करणे) या वातावरण हितकारी प्रयोगा सोबतच, त्यागाची भावना विकसीत करणे, (दान) दिवयत्वाचा गौरव करणे (देवपूजा) तसेच **समाज सुसंगतपणे** संघटीत करणे (संगतीकरण) या समाजहित कारी वेद विहित अनुष्ठानास यज्ञ म्हणतात.

याच अर्थाने '' देवतांसाठी द्रव्यांचा त्याग करणे'' आणि दान देवपूजा संगतीकरण या लक्षणानी **यज्ञ ओळखला जातो.**

मानवी जीवन कर्ममय असल्याने ते ज्ञानभक्तीने युक्त होऊन, ''सत्कर्मरत'' समाज निर्माण होऊन, **निवृत्त होण्यासाठीच** प्रवृत्ती धर्म विकसीत व्हावा तसेच कर्म अहंकारापासुन अलीप्त राहुन फलाशा न करणारा साधक '' **अवधाची संसार सुखाचा''** करण्यासाठी समर्पित व्हावा, या उच्च वैदिक जीवन धारणेचा संस्कार आचरणाद्वारे समाज मनात रुजावा **यासाठी स्व.दीक्षित** श्रीकृष्णजी सेलूकर महाराजांचे प्रपौत्र तथा महान सत्रयाजी दीक्षित रंगनाथ कृष्ण सेलूकर महाराजांचे **पुत्र दीक्षित यज्ञेश्वर** रंगनाथजी सेलूकर यांच्या शुभहस्ते.....

'' ऋतूणां षड्रात्र महासोमयाग ''

माघ शु.६ गुरुवार ते माघ कृ.३ सोमवार अर्थात दि.२१/०१/२०१० ते ०१/०२/२०१० या कालावधी मध्ये, गौतम ऋषी तपदर्शनी पवित्र सलीला गोदावरी मातेच्या कुशीत वसलेल्या **तपोभूमी श्री क्षेत्र नाशिक** मध्ये वेद विद् तपस्वी जनांच्या सहवासात संपन्न होत आहे. विश्वात्मक देवत्वाला संतोषदेणारा वाग्यज्ञ ज्या ज्ञानेश्वर माऊलीने संपन्न केला त्यांचे सद्गुरु जेष्ठ बंधू निवृत्ती नाथांना दीक्षा देणाऱ्या देवभूमी त्र्यंबकेश्वर स्थीत त्रिंबकराज महादेवाच्या असिम कृपा आशिर्वादाने संपन्न होत असलेल्या या महासोयागामध्ये दीक्षाविधी प्रायणीय इष्टि, सोमक्रय, प्रवर्ग्य उपसद् दष्टि, सवनाय, अवभ्रतादी यज्ञीय विधी बरोबरच प्रतिदीन हरि कथा संकीर्तन प्रवचन व्याख्यानादि उमक्रमा सोबत महाप्रसादांचे आयोजन करण्यात आले आहे.

यज्ञ संरक्षक, संवर्धक, प्रतिपालक, तसेच यज्ञरुप असलेल्या मर्यादा पुरुषोत्तम भागवान परिसरात संपन्न होत असलेल्या या यज्ञ सोहळ्यात आपण आवश्य उपस्थित राहून धर्म जागरणाच्या कार्यात सहभागी व्हावे.

गुरुबंधुंना महत्वाची सूचना

आम्ही या पत्रकाद्वारे सर्व गुरुबंधुंना सुसंवाद साधण्याच्या निमित्ताने हा त्रिव्यवहार चालू केला आहे. ज्यांचे पत्ते अथवा ज्ञात गुरुबंधु असतील त्याना पत्ता कळेवण्यास उद्युक्त करावे. पत्ता कळेवण्यास ५० पैशाच्या पोस्टकार्डवर नाव, गाव, तालुका, जिल्हा, पिनकोड, फोन नंबर लिहून गंगाखेड येथे पाठवावा.

PRINTED MATTER

जा. क्र.

बुक+पोस्ट

श्री. रा. रा. ____________________

____

____

प्रषिक : मा. सेक्रेटरी,
महर्षी याज्ञवाल्क्य संस्कृत विद्या प्रतिष्ठान,
यज्ञ भूमि, गंगाखेड.
जि. परभणी (०२४५३/२२२६२३)

महर्षी याज्ञवाल्क्य संस्कृत विद्या प्रतिष्ठाण, यज्ञ भूमि, गंगाखेड. या संस्थेच्या मालकीचे यज्ञ दर्शन पुष्प सातवे. हा माहितीचा अंक सेक्रेटरी श्री प्रकाश पवार - पाटील यांनी मुद्रक बाहेती ऑफसेट, परळी वै. येथे छापुन संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.